ISO 9001 : 2015
ISO 14001 : 2015
ISO 27001 : 2013
ISO 45001 : 2018

जनेप प्राधिकरण
JNPA

# जवाहरलाल नेहरु पत्तन प्राधिकरण
# JAWAHARLAL NEHRU PORT AUTHORITY

पत्तन कार्यालय : प्रशासन भवन, शेवा, नवी मुंबई - 400707. Port Office : Administration Bldg., Sheva Navi Mumbai - 400 707.
मुख्य सतर्कता अधिकारी Chief Vigilance Officer - (022) 2724 4151 : मुख्य प्रबंधक (प्रशासन) एवं सचिव Chief Manager (Admn.) & Secy - (022) 2724 4021 :
मुख्य प्रबंधक (यातायात) Chief Manager (Traffic) - (022) 2724 4191 : मुख्य प्रबंधक (यां.एव.वि.अ.) Chief Manager (M&EE) - (022) 2724 4181 :
मुख्य प्रबंधक (वित्त) Chief Manager (Fin) - (022) 2724 4081 : मुख्य प्रबंधक (प.यो.वि.) Chief Manager (PP&D) - (022) 2724 4156
उप-संरक्षक Dy. Conservator (022) 2724 4171 : हार्बर मास्टर (022) 2724 4173.
Website : www.jnport.gov.in • Email : info@jnport.gov.in

क्रमांक: जेएनपीए/ वाढवण/२०२४/1603 तारीख: २५/०१/२०२४

प्रति,

उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB),
एमआयडीसी कॉलनी, तारापूर,
पालघर जिल्हा, महाराष्ट्र राज्य - ४०१५०४

विषय: पालघर जिल्ह्यात विनाशकारी प्रस्तावित वाढवणं बंदर उभारणीमुळे मच्छिमार, शेतकरी, आदिवासी आदी भूमिपुत्र देशोधडीला लागणार असून पर्यावरणावर आणि पर्यावरणावर अवलंबून राहणाऱ्या उपजिविकेवर मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या जन सुनावणीच्या माध्यमातून सदर प्रकल्पाच्या पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अहलावावर हरकती नोंदवून वाढवण बंदर उभारणी कायमचे रद्द करण्याबाबत Clarification to the Major query raised by participant reg. Public hearing.

संदर्भ: अर्जदार: सौ अनिता प्रमोद तामोरे यांचा अर्ज दि १७.०१.२०२४

आदरणीय महोदय,

आपण सादर केलेल्या हरकतींचा खुलासा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सौ अनिता प्रमोद तामोरे यांचा अर्ज दि १७.०१.२०२४ | हरकतींचा खुलासा |
|---|---|---|
| १. | १) JNPA द्वारे रोजगाराच्या संधींचा खोटा दावा: दिनांक ०७/१०/२०२० रोजी केंद्रीय पर्यावरण MOEF&CC विभागाकडून जारी करण्यात आलेल्या TOR मधील मुद्दा क्रमांक २७ नुसार, वाढवण बंदराच्या निर्मिती नंतर कायमस्वरूपी नोकऱ्यांची संख्या मात्र १,००० एवढे असून कंत्राटी नोकऱ्यांची संख्या ६,००० मात्र एवढी होणार असल्याचे नमूद केले आहे.<br><br>२) लाखो मच्छिमार होणार बेरोजगार: | एमओईएफ़&सीसी अर्जा मध्ये नमूद केलेली आकडेवारी हि प्राथमिक स्वरूपाची होती परंतु बंदर व बंदरा समंधित इतर क्षेत्रातील रोजगाराच्या भरपूर संधी मिळण्याची शक्यता आहे ज्या प्रमाणे जनप मध्ये कस्टम क्लिअरिंग आणि फॉरवर्डिंग च्या क्षेत्रात ५० हजाराच्या वर लोक कार्यरत आहेत सदर वाढवण बंदर जनप च्या तिप्पट आहे व एक लाखा पेक्षा इतर क्षेत्रात नौकरी व धंदा संधी अपेक्षित आहे.<br>वाढवण बंदराच्या विकासामुळे बांधकाम टप्प्यात तसेच ऑपरेशन टप्प्यात स्थानिक लोकांना रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध होतील. |

| | | |
|---|---|---|
| | (अ) प्रस्तावित वाढवणं बंदर उभारणीमुळे मच्छिमार समाज आणि मासेमारी व्यवसायावर होणारा परिणाम जाणून घेण्यासाठी जेएनपीएच्या मागणी वरून ICAR- केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन बंदरावरील तटीय मत्स्यव्यवसायावरील होणाऱ्या परिणामावर बनविलेल्या अहवालानुसार प्रस्तावित बंदर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे मासेमारी आणि किनारी समुदायावर मोठा परिणाम होणार असल्याचे नमूद केले आहे आणि ह्या परिणामाचे प्रभाव अपरिवर्तनीय आणि कायमस्वरूपी राहणार असल्याचे अहवालात नमूद केले आहेत.<br><br>(क) सदर अहवालातील चौथ्या धड्यातील मुद्दा क्रमांक (अ.५) मध्ये, असे नमूद केले आहे की हे बंदर मासेमारी उद्योग पूर्णपणे नष्ट करणारा असेल कारण बंदरामुळे समुद्रात ५,००० एकरीवर भराव टाकला जाणार आहे तसेच अतिरिक्त प्रतिबंधित क्षेत्रे समुद्रातील क्षेत्र १७,००० एकर एवढे असणार आहे आणि शिपिंग चॅनेलमधील व बर्चिंग क्षेत्रामुळे मासेमारी क्षेत्र मर्यादित होऊन मासेमारी व्यवसायाला मोठ्या प्रमाणात कायमस्वरूपी आणि अपरिवर्तनीय नुकसान होणार असल्याचे अहवालात नमूद आहे.<br><br>(ख) CMFRI ने त्यांचे संशोधन करताना १६ मासेमारी गावांवर बंदराच्या निर्मितीचा थेट परिणाम होणार असल्याचे नमूद केले आहे, ज्यामध्ये अहवालात नमूद केल्याप्रमाणे एकूण 20,809 संख्या असलेल्या मच्छीमारांची लोकसंख्या | सध्याच्या राष्ट्रीय महामार्गापासून बंदरापर्यंत समर्पित रस्ता (३३.४ किमी),पालघर रेल्वे स्थानक ते बंदर (१२ किमी) रेल्वे मार्ग, ब्रेकवॉटर आणि विविध नागरी कामे इत्यादींसाठी पन्नास हजारांहून अधिक कुशल, अर्ध कुशल आणि अकुशल श्रेणीतील व्यक्तींची आवश्यकता असेल. मोठ्या संख्येने कुशल व्यक्तींची गरज लक्षात घेऊन, जनेप प्राधिकरणाने १४ व्यवसायांमध्ये आधीच कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू केले आहेत, जेणेकरून स्थानिक तरुण प्रकल्प बांधकामाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच सक्षम होतील.<br>एमओईएफ़&सीसी अर्जा मध्ये नमूद केलेली आकडेवारी हि प्राथमिक स्वरूपाची होती परंतु बंदर व बंदरा समंधित इतर क्षेत्रातील रोजगाराच्या भरपूर संधी मिळण्याची शक्यता आहे ज्या प्रमाणे जनप मध्ये कस्टम क्लिअरिंग आणि फॉरवर्डिंग च्या क्षेत्रात ५० हजाराच्या वर लोक कार्यरत आहेत सदर वाढवण बंदर जनप च्या तिप्पट आहे व एक लाखा पेक्षा इतर क्षेत्रात नौकरी व धंदा संधी अपेक्षित आहे<br><br>आतापर्यंत जनेप प्राधिकरणाने पर्यावरणाच्या संरक्षणाशी संबंधित 10 किमी परिसराचा मुंबईस्थित केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्था व राष्ट्रीय समुद्र विज्ञान यासारख्या नावाजलेल्या संस्थेकडून स्थानिक परिसर पर्यावरण, मासे, जैवविविधता मच्छीमार समाज, आणि समुद्र परिस्थितीचा केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या निर्देशांनुसार तज्ञ एजन्सींद्वारे तपशीलवार आणि व्यापक अभ्यास पूर्ण केला आहे आणि त्यांचे अहवाल स्थानिक ग्रामपंचायतींना सादर करण्यात आले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | कायमस्वरूपी आपला व्यवसाय गमावणार आहे.<br><br>(ग) शिवाय, उत्तन, वसई, सातपाटी, मढ, वर्सोवा येथील मच्छीमार ह्या पट्टयात मासेमारी करत असतात आणि मासेमारीवर होणाऱ्या निबंधामुळे, एकूण उपजीविकेचे नुकसान एक लाखाच्या वर जाणार असून जेएनपीटी उपलब्ध करून देणाऱ्या १००० नोकऱ्यांच्या कैकपटीने मच्छिमारांच्या अस्तित्वात असणारा उदरनिर्वाह संपुष्टात येणार आहे.<br><br>वरील मुद्दयांचे गांभीर्य लक्षात घेता सदर प्रकल्पाला स्थानिकांकडून कडाडून विरोध असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या उपरोक्त विषयानुषंगे जन सुनावणीला मी हरकत नोंदवित असून प्रस्तावित वाढवण बंदर उभारणीला केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी देऊ नये आणि ह्या बंदराला कायमचे रद्द करण्याची विनंती ह्या हरकती निवेदनाद्वारे करण्यात येत आहे. ह्याची नोंद महोदयानी घ्यावी, हि नम्र विनंती. | बंदराच्या आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या मच्छिमारांना राज्य सरकारच्या धोरणानुसार त्यांची उपजीविका आणि मत्स्यव्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची पुरेशी आर्थिक भरपाई केली जाईल.<br>अशा प्रकारे CMFRI ने अहवाल सादर करून बंदर व बंदरा संबंधित इतर क्षेत्रात स्थानिकांना रोजगारची व उद्योगधंद्याची भरपूर संधी उपलबद्ध होणार आहे. |

हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर महत्वाचा असून मा. प्रधानमंत्री कार्यालयाच्या स्तरावर देखरेख ठेवली जात असल्याने या प्रकल्पाची शिफारस लवकरात लवकर पुढील मंजुरीसाठी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयकडे करावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

हे पत्र अध्यक्ष (प्रभारी) यांच्या मान्यतेने जारी केले जाते.

आपला विश्वासू,

विश्वनाथ घरत

उप महाव्यवस्थापक (पयोवी)